# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०७/०२/२०२५ (शुक्रवार)**

---

## चारचाकी वाहन चोरी करणाऱ्या आरोपीला १२ तासात अटक
## कन्हान पोलसांची कारवाई

**पोलीस स्टेशन कन्हान** :– पोलीस स्टेशन कन्हान येथे फिर्यादी नामे अमोल सदाशिव कुंभलकर वय–३० वर्ष धंदा– शेती रा. बोरी सिंगोरी ता. पारशिवनी जि. नागपूर मो.क्र. ८७९९८६९०५१ यांनी तक्रार दिली कि, गावामध्ये दहिकाला सप्ताहचा (भागवत) कार्यक्रम असल्याने किराणा सामान खरेदी करण्याकरीता दिनांक. ०६/०२/२०२५ चे १२.०० वा ते १३.०० वा. दरम्यान फिर्यादी व गावातील इतर लोक कन्हान येथे फिर्यादीचे मंहिन्द्रा कंपनीची सुप्रो चारचाकी वाहन क्र. एम एच ४० सीडी २७३४ घेवून आले. कन्हान येथील प्रमोद किराणा येथे २०,०००/– रुपयाचा उपयोगी किराणा खरेदी करुन वाहनात ठेवले. फिर्यादी हे १० मीटर अंतरावर असलेल्या देवकृपा वस्त्र भंडार येथे पैसे देण्याकरीता गेले (फिर्यादीच्या नजरचुकीने वाहनात चाबी राहून गेली) त्यावेळी कोणीतरी अज्ञात इसमाने वाहनास चाबी लावून सदर वाहन क्र. एम एच ४० सीडी २७३४ अ.कि. २,२५,०००/– रुपये व त्यामध्ये ठेवलेला किराणा सामन २०,०००/– रुपये असा एकूण २,४५,०००/– रुपयाचा चोरून नेला अशा फिर्यादीच्या तक्रारीवरुन कलम ३०३(२) भारतीय.न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.

कन्हान पोलसांनी सदर गुन्हयाचा तपास तात्काळ सुरू केला आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे तसेच गोपनिय बातमीदारांमार्फतीने रेकॉर्ड वरिल आरोपी क्र १) सुभम राजेश सोमकुंवर वय–२४ वर्ष रा. सिहोरा ता. पारशिवनी जि. नागपूर (२) राहूल दिलीप कहार वय–२४ वर्ष रा. श्याम हार्डवेअर च्या मागे, हरिहरनगर, कांद्री ता. पारशिवनी जि. नागपूर यांना ताब्यात घेवुन गुन्हा झाल्यानंतर पोलीसांनी अवघ्या २ तासात आरोपीतांना अटक केली आहे. आरोपीच्या ताब्यातून चोरी गेलेले चारचाकी वाहन एक जुनी वापरती महिन्द्रा कंपनीची सुप्रो चारचाकी वाहन

क्र. एम एच ४० सीडी २७३४ अ.कि. २,२५,०००/— रुपये जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास कन्हान पोलीस करीत आहेत.



## चोरीचा गुन्हा उघड

**पोलीस स्टेशन कन्हान** :—पोलीस स्टेशन कन्हान फिर्यादी नामे संतोष सध्दू सुर्यवंशी वय— ४२ वर्ष रा. वार्ड क्र. ०५, कांद्री, कन्हान ता. पारशिवनी जि. नागपूर यांनी तक्रार दिली कि, दि.२८/१२/२०२४ चे ९.०० वा ते १२.३० वा दरम्यान त्यांच्या परीचयाच्या ३ विधीसंघर्षग्रस्त बालकांनी फिर्यादीचे घरातील सोन्याचे चंदीचे दागिने असा एकूण ४५०००/— रुपयाच्या ऐवज चोरून घरातून पळून गेले होते.फिर्यादीच्या रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कन्हान येथे कलम विधीसंघर्षग्रस्त बालकाविरूध्द चोरीचा गुन्हा नोंद आहे.

सदर विधीसंघर्षग्रस्त बालकाचा मागील एक महिण्यापासून मिळुन येत होते. सदर विधी संघर्षग्रस्त बालकाचा शोध घेवून चोरी केलेला संपुर्ण मुद्देमाल सोन्याचे चंदीचे दागिने असा एकूण ४५०००/— रुपयाच्या मुद्देमाल हस्तगत करून गुन्हा उघडीस आणला आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर